वाचा:-१. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र. सिटीएस ०८३/४५/
१०८३/४५८४३/३३६८/ल-१, मुंबई दिनांक १६/४/१९८५

२. विशेष कार्या अधिकारी, महसूल व वनविभाग यांचेकडील नं.सिटीएस १०८३/४५५८४३/
३३६८/ल-१, मुंबई दि.१९/९/१९९५

३.या कार्यालयाकडील क्रमांक क्र/ना.भू.१/ मि.प.अक्षरी नोंद/२०१५ पुणे दि. १६/२/२०१५

---

क्रमांक -ना.भू.१/संगणक मि.प.अक्षरी नोंद /१९
पुणे दिनांक २०/१२/२०१९

**परिपत्रक :-**

**विषय - संगणकीकृत मिळकत पत्रिकेवरील क्षेत्राची अक्षरी नोंद
डेटा मधून काढून टाकणेबाबत**

उपरोक्त वाचा सदरी नमूद क्र. ३ परिपत्रकाअन्वये खालील प्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१. नगर भूमापन अधिकारी/ उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालयातील सर्व गावांचे प्रत्येक मिळकत पत्रिकेवरील नमूद क्षेत्र व चौकशी नोंदवहीतील क्षेत्र याची वाजवी ती खात्री करुन रीतसर फेरफाराचे नोंद घेऊन अक्षरी क्षेत्र नमुद करावे. त्याकरिता आडवी नोंद घालण्यात यावी. नोंदीचा सर्व मजकूर धारकाचे नाव या सदरात घ्यावा.

२. नगर भूमापन अधिकारी /उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी सदरचे परिपत्रक निर्गमित झालेनंतर मिळकत पत्रिकेची नक्कल देण्यापूर्वी त्या मिळकतपत्रिकेवर क्षेत्राबाबतच्या अक्षरी नोंदीचा फेरफार घेवूनच देण्यात यावा.

सद्यस्थितीत सर्व मिळकतपत्रिकांचे संगणकीकरण पूर्ण होवून डिजीटल स्वरुपात डाटा तयार झालेला आहे. संगणकीकृत मिळकतपत्रिकेमध्ये 'क्षेत्र ' या रकान्यामध्ये अंकी व अक्षरी क्षेत्र लिहता येणे सहज शक्य आहे. संगणकीकरण केलेल्या क्षेत्रामध्ये आता अनधिकृत बदल करता येणार नाही तसेच कोणी तसा प्रयत्न केल्यास त्याची माहिती (Log) उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ज्या उद्देशाने क्षेत्राची नोंद घेणेचे परीपत्रक निर्गमित केले आहे. तो उद्देश संपूर्ण आडवी नोंद न ठेवता साध्य होत आहे. मिळकतपत्रिकेतील क्षेत्राचे आडवे नोंदीमुळे मोठी जागा (space) वापरली जात आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

१) दिनांक १६/२/२०१५ चे परिपत्रकामधील सूचनेप्रमाणे मिळकतपत्रिकेवर घेण्यात आलेली नोंद संगणकीकृत मिळकतपत्रिकेचे डेटा मधून काढून टाकावी.

२) संगणकीकृत मिळकतपत्रिकेवरील 'क्षेत्र' या रकान्यामध्ये क्षेत्राची अंकी व अक्षरी नोंद घेण्यात येत आहे.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करावी.

सही xxx

(एस.चोक्कलिंगम्)

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,

भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे.

निर्गमित

(बाळासाहेब काळे)

उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न

जमाबंदी आयुक्त (ना.भू.) पुणे.

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner